ijindex
digital directory of indian journals

ISSN NO-2231-4687
Impact Factor: 6.81 (SJIF)
UGC Referred Journal No:-64206

# International Journal of Management and Economics

Vol. I No. 29
March - 2019

CHETAN PUBLICATIONS AURANGABAD - INDIA

| | | | |
|---|---|---|---|
| 53 | An Overview Of Entrepreneurship In India | G. T. Waghmare | 215-217 |
| 54 | Entrepreneurship Development Process In India: A Study | R.R Paithankar | 218-221 |
| 55 | Emerging Trends In Commerce Education | D. U. Pawde | 222-224 |
| 56 | Role Of ICT In Higher Education | P. P. Bhujbal | 225-227 |
| 57 | Study Of Rural Entrepreneurship: A Case Study Of Dairy Man Entrepreneur | R. T Chavan<br>K. S. Pawar | 228-230 |
| 58 | Creating Women Entrepreneurs In India: A Theoretical Review | Trambak Kendre<br>Bhagwan Ghute | 231-233 |
| 59 | Role Of Non-Governmental Organization In Disaster Management | Hemant T. Shinde<br>Trambak Kendre<br>Bhagwan Ghute | 234-236 |
| 60 | Outsourcing And Off-Shoring: An Emerging Sector For Economic Development | B. J. Gaikwad | 237-241 |
| 61 | Empowerment Of Rural Women Through Skill Development | Nikitaa Srivastav | 242-244 |
| 62 | Opportunities Of Employment And Entrepreneurship In Indian Fisheries Sector | D. W. Patil<br>S. S. Markad | 245-249 |
| 63 | An Overview On Women Entrepreneurs | Anuja P Mudholkar | 250-253 |
| 64 | The Role And Growth Of Women Entrepreneurs In Garment Industry | P. S. Talreja,<br>A. V. Kulkarni | 254-256 |
| 65 | प्राचीन भारतीय व्यापार :– मौर्य, कुशान व गुप्तकालखंड | एस. के. कमळकर | 257-259 |
| 66 | उद्योजकता व आर्थिक विकास | गजानन अमृता भुरके | 260-262 |
| 67 | आर्थिक विकासात उदयोजकाची भूमिका | संजयकुमार एम. कांबळे | 263-265 |
| 68 | उद्योजकता और पत्र लेखन | शंकर रामभाऊ पजई | 266-267 |
| 69 | व्यावसायिक जगत में हिंदी विज्ञापन का महत्व | प्रमोद किशनराव घन | 268-269 |
| 70 | ग्रामीण अर्थव्यवस्था बदलते स्वरूप | माधव मोरे,<br>दीपक सु. धारवाडकर | 270-274 |
| 71 | यशस्वी उद्योजक आणि नीतीमूल्य समन्वयः एक अभ्यास | अंजली दत्तात्रय टापरे | 275-277 |
| 72 | Women's Entrepreneurship - Trends and good Practices | B. B. Mule | 278-280 |

International Journal of Management and Economics ISSN: 2231 – 4687
Impact Factor-6.81 (SJIF)
Vol. I No. 29 March -2019 UGC Referred Journal No:-64206

# उद्योजकता व आर्थिक विकास
## (ENTREPRENEURSHIP AND ECONOMIC DEVELOPMENT)

**भुरके गजानन अमृता**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड, ता. गंगाखेड जि. परभणी.

**प्रस्तावना**

आज भारत सामाजिक, औद्योगिक व आर्थिक विकासाच्या वाटेवर आहे. विशेषतः 1991 नंतर मुक्त अर्थव्यवस्था धोरण स्विकारल्यापासून आर्थिक विकासाला गती मिळाली आहे. आजची बाजारपेठ केवळ शहर किंवा देशापुरती मर्यादीत राहिलेली नाही तर जागतिक बाजारपेठ झालेली आहे. या जागतिक बाजारपेठेत उद्योजक हा अती महत्वाचा घटक बनला आहे. उद्योजकाच्या भूमिकेवर अनेक घटकांचा विकास अवलंबून आहे. त्यामुळे विविध अभ्यासक्रमात 'उद्योजक' व 'उद्योजकतेचा' समावेश होत असतांना आढळतो. उद्योजक व उद्योजकतेमुळेच पूर्वी कधी न घडलेले चमत्कार येत्या काही वर्षात घडतील यात शंकाच नाही. सध्या उद्योजक जन्मताच नसून सभोवतालच्या परिस्थितीतून तयार होवू शकतो अशी विचारसरणी तयार झालेली आहे ही विचारसरणी देशाच्या आर्थिक विकासासाठी पोषक ठरू शकते. तेंव्हा कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासासाठी उद्योजक हा घटक मोलाचा ठरतो. प्रसिध्द व्यवस्थापन तज्ञ पीटर ड्रकर यांच्या मते, "देशाच्या प्रगतीसाठी उद्योजकीय समाज निर्माण होणे गरजेचे आहे." एकेकाळी जपान या राष्ट्राची आर्थिक स्थिती फारच बिकट होती. परंतू सद्यस्थितीत जपान एक विकसीत राष्ट्र आहे. कारण तेथे उद्योजकीय समाज निर्माण झालेला आहे. तुलनेत आपल्या देशाची औद्योगिक प्रगती मंद गतीने होत आहे. तसा समाज, धोरण, राजकीय स्थिती व उद्योजक होण्याची मानसिकता आपल्या देशात नाही.

**आर्थिक विकासात उद्योजकाची भूमिकाः**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास साधण्यासाठी देशातील नैसर्गिक साधनसामुग्री बरोबरच पायाभूत सुविधा, भांडवल, आर्थिक व औद्योगिक धोरण, राजकीय व्यवस्था इत्यादी अनेक घटक महत्वाचे ठरतात. या सर्व घटकांचा समन्वय साधून त्यापासून काही नाविण्य निर्माण करणारा घटक म्हणजे उद्योजक होय.

उद्योजक या घटकामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते यासाठी उद्योजक विविध भूमिका बजावत असतो ते पुढील प्रमाणे.

1. ***भांडवल निर्मिती :***

कोणत्याही व्यवसायाची, कंपनीची किंवा उद्योगाची स्थापना करण्यासाठी प्रथमता भांडवलाचा विचार केला जातो. सध्या भांडवल उभारणीसाठी भांडवल बाजार उपलब्ध आहेत. या भांडवल बाजारात लोकांकडून गुंतवणूकीच्या स्वरूपात पैसा जमा केला जातो. त्याचा वापर भांडवल स्वरूपात अनेक उद्योजक करतात. या भांडवलातून उद्योगाला लागणारी जागा, इमारत, सयंत्र, कच्चा माल, सेवा इ. उत्पादनाच्या साधनाची उभारणी करून ते कार्यन्वित करतात. ही तर खरी भांडवल निर्मिती ठरते. यातून वस्तू व सेवांची निर्मिती होते व परिणामी आर्थिक विकास होतो. हया मागे उद्योजक असतो.

2. **उत्पादन प्रकितील महत्वाचा घटक :**

आर्थिक विकास जलदगतीने करण्यासाठी विविध क्षेत्रातील उत्पादन प्रक्रिया जलद होणे गरजेचे आहे. विशेषतः उद्योगात उत्पादन घेण्यासाठी वेगवेगळया घटका एकत्र आणून त्यामध्ये समन्वय साधून उत्पादन प्रक्रिया पूर्ण करावी लागते. यासाठी तेवढाच कुशल उद्योजक लागतो. म्हणजे उत्पादन प्रक्रियेसाठी उद्योजकाला चांगली भुमिका पार पाडावी लागतो.

3. ***नवनिर्माणाची जबाबदारी पार पाडतो :***

उद्योजकाला सतत केवळ उत्पादन करून चालत नाही, तर ग्राहकांच्या आवडी–निवडीनुसार गरजेनुसार उत्पादनामध्ये नव–नविन बदल करावे लागतात. असे केले तरच तो किंवा त्याचे उत्पादन जागतिक बाजारपेठेत ठिकून राहते. यासाठी उद्योजकाला विपणन संशोधन करून नवनिर्मितीसाठी नविन तंत्र, यंत्राच्या वापराबरोबरच कच्चामाल, उत्पादन घटक, विपणन निती यामध्ये वेळोवेळी बदल करावे लागतात. ही जबाबदारी पेलण्याची भूमिका उद्योजक पार पाडतो. यातुन बाजारपेठ विस्तारते व परिणामी आर्थिक विकास होण्यास मदत होते.

4. ***भांडवलाचा कार्यक्षमपणे वापरः***

आपला देश विकसनशिल असल्यामुळे आपल्याकडे भांडवलाची कमरता जाणवते, तेंव्हा जलद उत्पादन किंवा नवनिर्मिती करीत असतांना भांडवलाची आपव्यय न करता त्याचा काटकसरीने वापर केल्यास भांडवलाची बचत होते. कुशल उद्योजक उत्पादन खर्चात काटकसर करून भांडवालचा कार्यक्षमपणे वापर करतो. जे की, आर्थिक विकासाच्या दृष्टिने फायदेशीर ठरते.

5. ***जोखीम स्वीकारणे :***

विशेषतः उद्योगामध्ये मोठया प्रमाणात भांडवल गुंतवावे लागते. ते भांडवल वसूल होण्याची हमी नसते. कारण उत्पादन घटाकंना त्यांचा मोबदला अगोदरच द्यावा लागतो व त्यानंतर उत्पादन बाजारात विक्री करावे लागते. त्या उत्पादनाला बाजारात योग्य किंमत मिळेल याची हमी नसते, कारण सध्या कोणत्याही उत्पादनाला मोठयाप्रमाणात स्पर्धक निर्माण झाले आहेत. या बरोबरच जागरूक ग्राहक, पर्यावरणविषयक जागरूकता त्यामुळे विक्रेत्याचे प्राबल्य कमी होवून ग्राहकाचे प्राबल्य वाढले आहे. अशा परिस्थितीत उद्योजक वाढलेल्या जोखमीचा स्विकार करून आर्थिक विकासासाठी उत्पादन कार्य सुरु ठेवण्याची भूमिका पार पाडतो.

6. ***रोजगार निर्माण करणे:***

विकसनशील देशात बेरोजगारी मोठी समस्या असते. परंतू देशातील उद्योजक स्वयंरोजगार बरोबरच इतरांनाही मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देतात. त्यामध्ये व्यवस्थापक, तंत्रज्ञ, कुशल–अकुशल कामगार, कार्यालयीन कर्मचारी इ. यांना मिळणा–या उत्पन्नामुळे वस्तू व सेवांची मागणी निर्माण होते. परिणामी आर्थिक विकासाला चालना मिळते. अशी रोजगार निर्मितीची उद्योजकांची भूमिका शासनापेक्षा सरस ठरते आहे.

7. ***संबंधीत उद्योग–व्यवसायाला चालना देणे :***

एखादा विशिष्ट उद्योग सुरू केल्यानंतर त्या उद्योगा लागणारा कच्चा माल तयार करणा–या वयवसायाला चालना मिळते. तसेच त्या उत्पादनाची विक्री करणारे, दुरूस्ती करणारे, देखभाल करणारे अशा अवलंबुन असणा–या व्यवसायांना चालना मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होते. परिणामी आर्थिक विकास होण्यास मदत होते.

8. ***समतोल प्रादेशिक विकास साधणे :***

काही राज्याचा किंवा प्रदेशाचा मोठया प्रमाणात विकास झाला म्हणजे देशाचा विकास झाला असे म्हणता येत नाही. त्यासाठी देशातील सर्व प्रदेशाचा साधारण सारख्या प्रमाणात आर्थिक विकास होणे गरजेचे आहे. तरच विकासात समतोल साधला असे म्हाता येईल. काही प्रदेश किंवा भाग आर्थिक दृष्टया मागास असतील त्या भागात उद्योग स्थापना करण्यासाठी सरकार औद्योगिक धोरणामध्ये तरतुद

करत असतात. उद्योजकांना सोयी सवलती व उद्योगासाठी लागणा–या मुलभूत गरजांची पूर्तता करतात. म्हणजेच समतोल प्रादेशिक विकासासाठी उद्योजक हा महत्वाचा घटक ठरतो आहे.

***9. सामाजिक जबाबदारी पार पाडणे:***

कोणताही उद्योग हा नफा कमविण्याच्या उद्देशाने स्थापन केलेला असतो. असे असले तरीही उद्योगांचा समाजातील अनेक घटकांशी प्रत्येक्ष–अप्रत्यक्ष संबंध येत असतो. यामध्ये उद्योगाचे गुंतवणूकदार, वितरक, जाहिरातदार, विक्रेते व मार्गदर्शक सल्लागार इ. व्यक्ती संबंधीत असतात. ब–याच व्यक्तींचे उद्योगात हित समावलेले असतात. अशा वेळेस उद्योजक सर्वच घटकांचा समतोल विचार करून, व्यवसायिक नितिमता टिकवून सामाजिक जबाबदारी पार पाडण्याची भूमिका बजावतो.

***10. लोकांचे जीवनमान उंचवावणे :***

उद्योजकांमुळे अनेकांना रोजगार मिळाल्यामुळे त्यांच्या, उत्पन्नात वाढ होवुन त्यांचे जीवनमान उंचावते तर दुसरीकडे लोकांना नव–नवीन वस्तू व सेवा यांचा उपभोग घेता येतो त्यामुळे त्यांच्या विविधता व संपन्नता येते. परिणामी लोकांचे जीवनमान उंचावते. यावरून आर्थिक विकासाचे मोजमाप होत असते आणि यासाठी उद्योजकांची भूमिका महत्वाची ठरली आहे असे म्हणता येईल.

**निष्कर्ष :**

आपला देश कृषी प्रधान असल्यामुळे शेती क्षेत्राला अग्रक्रम दिलेला आहे. यांचा आर्थ केवळ शेतीक्षेत्रावरच आर्थिक विकास अवलंबुन आहे असा होत नाही. आर्थिक विकास साधण्यासाठी शेती क्षेत्राबरोबरच, (उद्योग क्षेत्र) औद्योगिक क्षेत्र व सेवा क्षेत्र तेवढेच महतवाचे आहेत. विशेषतः कोणत्याही देशाचा जलद आर्थिक विकास करण्यास औद्योगिक क्षेत्र कारणीभूत ठरले आहे. तेंव्हा आपल्या देशाच्या जलद आर्थिक विकासात सरकारच्या औद्योगिक धोरणाच्या मदतीने देशातील उद्योजकाने मोलाची भूमिका बजावत आहेत परंतू ग्रामीण भागात पाहिजे तेवढया प्रमाणात उद्योजकता विकसीत झालेली नाही. त्यासाठी खास सरकारी धोरणे आखली जावेत हिच आपेक्षा.

**संदर्भ :**

- *औद्योगिक विकास : प्रा. डॉ. प्रभाकर देशमुख*
- *उद्योजकता : डॉ. जितेंद्र अहिरराव*
- *Entrepreneurship Development : Bishwanath Ghosal*
- *Entrepreneurship Development : Shaish Taneja, S.L. Gupta*
- *भारतीय अर्थव्यवस्था : डॉ. यु.बी. कोंडेवार*
- *Entrepreneurship Development : Dr. G. K. Varshney*
- *व्यवसाय नियोजन व धोरण: प्रा. सुधाकर मानकर, प्रा. रमेश देशपांडे*